स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र
विषयातील पीएच.डी पदवीकरिता सादर करण्यात येणारा
शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

**'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री स्वातंत्र्य संकल्पनेचा
चिकित्सक अभ्यास'**

-: संशोधक :-

मनिषा काशिनाथरावपाटील
राज्यशास्त्र संशोधन केंद्र,
पीपल्स कॉलेज, नांदेड.

-: मार्गदर्शक:-

डॉ. शरद कुलकर्णी
प्राचार्य, विभाग प्रमुख,राज्यशास्त्र विभाग,
नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी

मे - २०१७

‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री स्वातंत्र्य संकल्पनेचा चिकित्सक अभ्यास’

प्रस्तावना :-(Introduction)

स्त्रियांचे कैवारी, भारतरत्न, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक कार्यात महिलांना आपल्या सोबत घेवून कार्य केले.स्त्रियांचा सर्वांगीण विकास, उध्दार व्हावा यासाठी त्यांना शिक्षण, अधिकार, हक्क मिळवून देणे मानवतावादी जीवन प्रदान केले.स्त्रियांना सतत प्रेरणा देवून, जागृत करून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणले. स्त्रियांना कायद्याने अधिकार मिळावेत यासाठी हिंदू कोड बिलतयार केले. या कोड बिलातून स्त्रियांना त्यांनी वारसा हक्क, दत्तक विधी, पोटगी, घटस्फोट, विवाह इ. संबधीचे अधिकार कायद्याच्या स्वरूपात मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

प्राचीन काळापासून स्त्रियांच्या दर्जाचा विचार केल्यास तिला समाजात दुय्यम स्थान दिले गेले. मनूने तर स्त्रिया या भ्रष्ट, वाईट मार्गाने चालणाऱ्या, चंचल, निष्ठूर, बेईमान, पापी, क्रोधी, व्याभिचारी आहे असे सांगितले. त्यामुळे अशा स्त्रियांवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांनी धार्मिक, अन्यायकारक असा कायदा तयार केला. अशा धर्माच्या निति नियमाचे पालन स्त्रियांनी करावे आणि ते दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचवावे ही जबाबदारी त्यांच्यावर लादण्यात आली.[१] स्त्रियांसाठी तयार केलेल्या कायद्याव्दारे स्त्रिला एका पुरूषाच्या नियंत्रणाखाली, स्वतंत्र राहण्यास योग्य नसलेली म्हणून स्त्रिला पारतंत्र्यात ठेवण्यात आले. त्यामुळे स्त्रिचे बालपणी तिचा पिता रक्षण करतो, तरूणपणी पती आणि वृध्द वयात तिची मुले संरक्षण करतात.कोणत्याही काळात स्वतंत्र राहण्यास स्त्री योग्य नाही असे मनूचे विचार आहेत.त्यामुळे हिंदू समाजातील पुरूषास स्त्रियांनी गृहलक्ष्मी तेवढे व्हावे.त्याच्या पुढे स्त्रियांच्या प्रगतीची मजल जावू नये.[२]असे वाटत होते.यातून स्त्रियांनी घरातील कामे, पुरूषांचे वर्चस्व मान्य करून जीवन व्यतीत करावे असे त्यांना वाटत असे.हे घडण्यामागचे कारण पुरूषी स्वाभिमत्वाची, पुरूषी अहंकाराची भावना[३]होती. यामुळेच या विचारातून हिंदू सुधारकांचा संकुचितपणा आंबेडकरांना दिसून आला.ब्रिटिश पूर्व काळात दीर्घकाळ भारतीय समाजात स्त्रियांना डोके वर काढण्याची संधी नव्हती तसेच समाजसुधारक उदयाला यायला ही वाव नव्हता.ब्रिटीश भारतातच आधुनिक शिक्षणासोबत आधुनिक विचार आणि समाजसुधारकाची एक फळी निर्माण झाली.यातही काही बोलके सुधारक आणि काही कर्ते सुधारक होते. जेंव्हा कोणीच बोलत नव्हते तेंव्हा बोलण्यालाही महत्त्व असतेच. तेच महाराष्ट्रात आधुनिक काळात प्रामुख्याने महात्मा फुले यांनी स्त्रि स्वातंत्र्याचा, शिक्षणाचा विचार केला. तोच वारसा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विकसित केला.मनू हा स्त्रियांना स्वातंत्र्य देवू इच्छित नव्हता.अशा विचारांच्या हिंदू धर्मामूळे आंबेडकर म्हणतात. हिंदू धर्मच स्त्रियांच्या अवनतीस जबाबदार आहे.[३] असे म्हणण्यामागचे कारण म्हणजे

भारतात हिंदू धर्मातील मनूच्या कायद्यामुळे स्त्री राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक दृष्ट्या परावलंबी झाली. त्यामूळे स्त्रियांचे जीवन धर्म, रूढी , परंपरा यामूळे बंदिस्त, परावलंबी झाले. तिची प्रगती खुंटली.त्यामुळे ती संस्कार, शिक्षण व स्वावलंबन यांच्या अभावामुळे शूद्रापेक्षा हीन मानल्या गेली. अशा परिस्थितीत आंबेडकरांना वाटे माणसे ही जन्मतः समान आहेत. व ती मरेपर्यंत तशीच राहणार[५]असे म्हणण्यामागचे कारण आंबेडकरांना वाटते व्यक्तींने व्यक्तीचे जातीमुळे विभाजन केले आहे.ते कोणत्याही वर्णाचे असले तरी ते सारखेच आहेत. असे त्यांना वाटते. ते स्त्री-पुरूष भेद करत नसत त्यामुळे ते म्हणतात, दरेक व्यक्ति मात्राला पूर्णावस्थेत जाण्यास समाजाने अवसर दिला पाहिजे.[६]या विचारातून आंबेडकरांनी समाजसुधारकांनी संकुचितपणा न ठेवता सर्वांचा विकास करता यावा अशी परिस्थिती निर्माण करावी असे वाटत असे. त्यामुळे स्त्री विकासासाठी त्यांनी उच्च प्रतीचे ध्येय जीवनात आपल्या समोर ठेवावे असे ते म्हणत. त्यामुळेच त्यांना वाटे ध्येय प्राप्ती न होणे हा काही गुन्हा नाही, पण कमी प्रतीचे ध्येय डोळ्यापुढे ठेवणे हा मात्र मोठा गुन्हा आहे.[७]यावरुन जीवनात व्यक्तीने नेहमी उच्च ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या प्राप्ती करीता वाटचाल करावी असे वाटत असे त्यातून आपल्या समाजातील स्त्री-पुरूष विषमता दूर व्हावी असे त्यांना वाटे. आंबेडकरांनी कामगारांचे कष्ट जवळून अनुवभवले असल्यामुळे त्यांनी कायदा मंत्री झाल्यावर कामगार कायदा करतांना त्यांत अधिक सुधारणा केल्या. या कायद्यात स्त्रीचे शोषण व दुय्यमत्व काढण्यासाठी काही सुधारणा होत्या.त्यामध्ये स्त्रियांना कारखाना कायद्यामुळे रात्री काम करण्याची बंदी घातली.स्त्रियांच्या प्रसुती काळात त्यांना विशेष भर पगारी रजेचा कायदा मिळवा म्हणून विशेष प्रयत्न केले.खानी प्रसुती लाभ कायद्यात सुधारणा केली.भुमिगत कोळसा खाणीतील महिला कामगारांसांठी प्रसुती लाभ (संशोधन) विधेयक मंजूर करवून घेतले.[८] या प्रमुख तरतुदी होत्या.यामुळे स्त्रियांना प्रस्तुती पूर्व काळात ठराविक विश्रांती व सोयी मिळाल्या[९]होत्या.त्या तरतुदी सोबत कामगारांच्या कल्याणासाठी स्त्रि-पुरूष समानवेतन याही सुधारणा केल्या. आंबेडकरांनी स्त्रियांच्या आरोग्यविषयक सुधारणा करण्यास महत्त्व दिले त्यामुळे १९३८ साली स्वतंत्र मजूर पक्षातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वतीने पी.जे.रोहम यांनी मुंबई प्रांत विधिमंडळात संतती नियमनाबाबतचे अशासकीय विधेयक मांडले[१०]हे विधेयक मांडण्यामागचा उद्देश समाजात आर्थिक विकासात अडथळा निर्माण करणारी लोकसंख्या कमी करण्यासाठी संतती नियमनावर जोर देणे, स्त्री आरोग्य सांभाळणे हा होता. या संतती नियमन विधेयकाच्या माध्यमातून बाबासाहेबांना कुटूंबाचे नियोजन व्हावे, यातून स्त्री बाळंत कमी व्हावी आणि तिच्यातली स्त्री इतर कामांकडे वळवावी असे वाटत असे.त्यामुळे त्यांनी कुटूंब नियोजनाचे महत्त्व पटवून दिले.

मुंबई असेंब्लीत बजेटवरील चर्चेत भाग घेऊन दि. २१ फेब्रु १९२८ रोजी आंबेडकरांनी सरकारी धोरणावर टीका केली. कर्मचारी स्त्रियांच्या बाळंतपणात त्यांना रजा मिळविण्यासंबंधी आलेल्या विधेयकाचे जोरदार समर्थन करून ते म्हणाले देशातील मातांना मातृत्वाच्या ठराविक

काळात विश्रांती मिळायलाच हवी तसेच याचा खर्च शासनाने अथवा मालकाने सहन करायला हवा [११] असे त्यांनी सुचविले. त्यामुळेच आंबेडकर विधिमंडळात काम करत असतांना त्यांनी स्त्री कामगराचे हित, स्त्री कामगारांच्या प्रसुती काळात सवलती देण्यासंबधी विधेयक विधिमंडळात मांडण्यात आले आले होते [१२] याच विधेयकास पाठिंबा आंबेडकरांनी दिला. आपल्या भाषणात ते म्हणाले, प्रत्येक मातेला प्रसूती पूर्व काळात आणि प्रसुती नंतरच्या काळात काही ठराविक काळापर्यंत विश्रांती मिळविणे हे राष्ट्राच्या दृष्टीने हिताचे आहे असे मी मानतो [१३] आंबेडकरांच्या सहकार्यामूळे महिलांचा सामाजिक कार्यात सहभाग वाढला. त्यामुळे १९३० साली काळाराम मंदिर सत्याग्रहात पहिली अटक होणारी तुकटी स्त्रियांचीच होती [१४] १९४४ च्या हैद्राबादच्या भाषणात स्त्रियांना त्यांनी समता सैनिक दलात भाग घेतला म्हणून मार्गदर्शन करतांना आंबेडकर म्हणाले, त्यांनी पुरूषांबरोबर सार्वजनिक आयुष्यात उतरले पाहिजे ते पुढे असेही म्हणाले की पुरूष वर्ग पुढे जाऊन स्त्री या मागे राहिल्या तर कुठल्याही समाजाची प्रगती होणार नाही. म्हणून स्त्रियांनी आता पुरूषांच्या खाद्यांला खांदा लावून लढले पाहिजे, म्हणजे आपले स्वातंत्र्य आपल्याला लवकर मिळेल [१५] घराच्या चारभिंती एवढेच तिचे मर्यादित क्षेत्र नाही तर ही विशालदृष्टी आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव बाबासाहेबांनी स्त्रियांमध्ये निर्माण केली [१६] आंबेडकरांनी स्त्रियांना कौटुंबिक जबाबदारी स्वीकारून सुरूवातीस त्यांनी कुंटूंबात सुधारणा करण्यास सांगितले. त्यांनी स्त्रियांना कुंटूंबात कणखर वागण्यास सांगितले.

संशोधन विषयाची निवड :- (Selection of subject)

पती-पत्नीचे नाते हे घनिष्ठ मित्राचे नाते असले पाहिजे.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मानवी समाजाच्या विकास प्रक्रियेतस्वातंत्र्य, समता, लोकशाही या तत्त्वावर आधारित अशा मातृसत्ताक समाजव्यवस्थेच्या ऱ्हासाच्या प्रक्रियेतून पितृसत्ताक व्यवस्था आणि स्त्री दास्य, वर्गीय विषमता आणि वर्गीय शोषण अशा विविध स्वरूपात शोषणाधिष्टित समाजव्यवस्था विकसित होत गेली. मानवी समाजाच्या विकास प्रक्रियेत मालक वर्ग आणि गुलाम वर्ग, शोषक शोषित वर्ग, शोषित-शाषित वर्ग, यांच्यातील हितसंबंधाच्या संघर्षाच्या मानवी इतिहास असल्याचे दिसून येते.मातृसत्ताक समाजव्यवस्थेनंतर प्रत्येक टप्प्यावर स्त्रियांचा दर्जा सर्वसामान्यपणे गुलामाचा राहिलेला आहे.मानवी विकास प्रक्रियेत आणि वर्गसंघर्षाच्या ऐतिहासिक विकास प्रक्रियेत जसा गुलामांच्या, शोषितांच्या, स्वातंत्र्याचा मुक्तीचा प्रश्न कळीचा राहिलेला आहे. त्याच प्रमाणे पितृसत्ताक व्यवस्था विकसित झाल्यानंतर स्त्री स्वातंत्र्य, स्त्री मुक्तीचा प्रश्न हा एक कळीचा प्रश्न जागतिक मानवी समाजात आजतागायत काम राहिलेला आहे . मानवी विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्रीमुक्तीचा प्रश्न म्हणून प्रश्न

राहिलेला आहे. गणराज्य अवस्थेला किंवा नगर राज्य अवस्थेला मालक व गुलाम संबंधावरिल गुलामगिरीची अवस्था म्हणून ओळखले जाते.या मालक गुलाम सबंधात गुलामांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या संघर्षात स्त्री स्वातंत्र्याचा विचार केल्याचे दिसून येत नाही. पुढील टप्प्यावर म्हणजे सरंजामशाही अवस्थेत स्त्रीयांचा दर्जा अधिक शोषित आणि हिणकस अवस्थेला गेलेला दिसून येतो आणि सरंजामशाही नंतर आलेल्या भांडवलशाही अवस्थेत उदारमतवादी विचार सरणीच्या माध्यमातून अधिक गंभीरपणे स्त्री स्वातंत्र्याचा विचार पुढे आलेला दिसून येतो.

बुध्दाच्या काळात पितृसत्ता विकसित झालेली होती.बुध्दाने आपल्या भिक्खू संघात स्त्रीयांना प्रवेश नाकारलेला होता. बुध्द जर समतेचा पुरस्कर्ता असेल तर तो स्त्रीयांना भिक्खू संघात प्रवेश कसा काय नाकारू शकतो असा प्रश्न उपस्थित करून महामायाने ५०० स्त्रीयांना सोबत घेवून भिक्खू संघावर मोर्चा काढून स्त्रीयांना भिक्खू संघात प्रवेश देण्याची मागणी केली होती आणि तत्कालीन बुध्दाचे अनुयायी सहकारी भिक्खू आनंद यांच्या सल्ल्यानुसार बुध्दाने भिक्खू संघात स्त्रीयांना प्रवेश देण्याचे मान्य केले आणि त्यानुसार भिक्खू संघा अंतर्गत महिला भिक्खू संघ मान्यता देवून निर्माण करण्यात आला होता. भिक्खू संघात प्रवेश मिळविण्यासाठी म्हणजे कुंटूंबातून मुक्त होवून स्वतंत्र जीवन जगण्यासाठी आपल्या स्वातंत्र्यासाठी स्त्रियांनी केलेल्या या संघर्षाचे निर्विवादपणे ऐतिहासिक महत्त्व आहे.इ.स. पूर्व काळापासून शोषित-पिडीत, सामाजिक समूहांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न जसा सातत्याने ऐरणीवर राहिलेला आहे त्याचप्रमाणे स्त्री स्वातंत्र्याचा स्त्री मुक्तीचा प्रश्न ही कमी अधिक प्रमाणात एक जीवन प्रश्न म्हणून राहिला आहे. उदामतवादाच्या विकास प्रक्रियेत आणि भांडवलशाही राज्य राजकारणाच्या विकास प्रक्रियेत स्वातंत्र्य, मातृभाव, लोकशाही या संकल्पनांचा जसा तात्वीक विकास झाला त्याचप्रमाणे व्यावहारिक विकास ही झालेला दिसून येतो याच प्रक्रियेत स्त्री स्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती, स्त्री-पुरूष समता, स्त्रीवाद हा विचार ही तात्वीक आणि व्यावहारिक स्वरूपात विकसित झालेला दिसून येतो. जागतिक पातळीवर प्रामुख्याने युरोपमध्ये उदारमतवादातून विकसित झालेला स्त्रीमुक्तीचा विचार आणि मार्क्सवादातून विकसित झालेला स्त्री मुक्तीचा विचार असे प्रामुख्याने दोन प्रवाह दिसून येतात.याच प्रवाहाच्या प्रभावातून जगभर स्त्रीमुक्तीच्या चळवळी, स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळी आणि स्त्रीवादी दृष्टिकोन विकसित झालेला दिसून येतो. उदारमतवादी, मार्क्सवादी आदी स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्रीमुक्ती दृष्टीकोन ज्या पाश्चात्य जगात अस्तित्वात आला त्या समाजाचे स्वरूप हे पितृसत्ताक आणि वर्गीय सत्तेचे राहिलेले आहे परंतू भारतात केवळ पितृसत्ताक समाज किंवा वर्गीय सत्तेचा समाज केवळ अशा स्वरूपाचा समाज राहिलेला नाही तर यासह जातीव्यवस्था असलेला समाज हे भारतीय समाजाचे एक वेगळे वैशिष्ट्ये राहिलेले आहे. त्यामुळे भारतात मानवी स्वातंत्र्याचा विचार हा केवळ वर्ग विग्राहाचा विचार आणि पितृसत्ताक नष्ट करण्याचा विचार येथे पुरेसा ठरत नाही.येथे

जातीअंताचा विचार ही तितकाच महत्त्वाचा ठरतो.म्हणून भारतीय संदर्भात महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या मानव मुक्तीच्या विचारात वर्ग विहीन, स्त्री दास्य विहीन, समाजनिर्मिती इतकेच जातीविहीन समाजनिर्मीती करणे तितकेच महत्त्वाचे मानलेले आहे. भारतातील पितृसत्ताक व्यवस्था, जातीव्यवस्था, वर्ण, वर्गव्यवस्था यांच्या परस्पर संबंधातून एक वेगळ्या प्रकारची पितृसत्ताक, सरंजामी आणि भांडवली व्यवस्था विकसीत झालेली आहे तिला जाती, वर्ण व्यवस्थेचे, स्त्रियांच्या गुलागिरीचे अधिष्ठान राहिलेले आहे. या पार्श्वभूमीवर महात्मा फुलेंनी मानवी स्वातंत्र्यांच्या संदर्भात स्त्री स्वातंत्र्याचा केलेला विचार आणि बाबासाहेब आंबेडकरांनी तोच वारसा स्वीकारत मानव मुक्तीचा, स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्री मुक्तीचा केलेला विचार यात एक वेगळेपण असल्याचे दिसून येते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विचारात आणि संघर्षात मानवी स्वातंत्र्याला जितके महत्त्व दिलेले आहे.तितकेच स्त्री स्वातंत्र्याला आणि स्त्री मुक्तीलाही महत्त्व दिलेले आहे. त्यांनी लिहलेल्या १) भारतीय स्त्रियांची उन्नती आणि अवनती २) भारतातील जाती ३) जातीय निर्मूलन याशिवाय हिंदू कोड बील यातून आणि संदर्भीत इतर लेखनातून ही गंभीरपणे स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्रीमुक्तीचा विचार केलेला दिसून येतो जो पाश्चात्य स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्रीमुक्तीच्या विचाराच्या तुलनेत मुलभूत स्वरूपात वेगळ्या प्रकारचा असल्याचे दिसून येते त्यामूळे भारतातील वर्गान्तांचा प्रश्न, जातीअंताचा प्रश्न आणि स्त्री दास्य अंताचा प्रश्न यांच्यातील अंतरसंबंध आंबेडकरवादाशिवाय म्हणजे आंबेडकरवादातून व्यक्त होणाऱ्या स्त्री स्वातंत्र्याच्या विचाराशिवाय, स्त्री मुक्तीच्या विचाराशिवाय निट समजून घेता येणार नाही. पाश्चात्य जगात उदयाला आलेल्या उदारमतवादी, मार्क्सवादी तत्वज्ञान भारतीय स्त्री स्वातंत्र्य, स्त्रीमुक्तीसाठी पुरेसे ठरू शकत नाही. त्यांच्या मर्यादा वेळोवेळी सिध्द झाल्याचे ही दिसून येते म्हणून भारताच्या संदर्भात स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्रीमुक्तीचा विचार आंबेडकरवादी वर्गान्तांच्या, जातीअंताच्या आणि स्त्रीदास्य अंताच्या विचाराचा पायावरच योग्य पध्दतीने समजून घेतला जाऊ शकतो. भारतीय समाज व्यवस्थेचे आणि पाश्चात्य समाज व्यवस्थेचे तुलनात्मक अध्ययन करतात. तसेच पाश्चात्य मानव मुक्तीच्या विचारांचे, स्त्रीमुक्तीच्या विचारांचे आणि भारतीय स्त्रीमुक्तीच्या विचारांचे तुलनात्मक अध्ययन केल्यास भारतीय स्त्री स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीकोनातून पाहणे त्यासाठी आंबेडकरवादी स्त्रीमुक्तीचा दृष्टीकोन किंवा आंबेडकरवादी स्त्री स्वातंत्र्याचा दृष्टीकोन आणि आंबेडकरवादी स्त्रीवाद वेगळ्या पध्दतीने समजून घेणे आवश्यक ठरते. या गंभीर जाणीवेतून पीएच.डी.या पदवीसाठी‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री स्वातंत्र्यसंकल्पनेचा चिकित्सक अभ्यास’हा संशोधन प्रकल्प मार्गदर्शकांशी विचार विनिमय करून निश्चित केलेला आहे.

भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने समतेचे हक्क प्राप्त झाले.हिंदू कोड बिलाला मान्यता दिली.पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीयांचे समतेचे हक्क मान्य

करण्यात आले तरी अजूनही वर्गीय शोषण, जातीय शोषण तसेच पितृसत्तेच्या माध्यमातून स्त्रीयांचे अव्याहत शोषण चालू आहे.अजूनही स्त्रीयांना वास्तवात स्वातंत्र्याचे समतेचे लोकशाही हक्क वास्तवात प्राप्त झाले असे म्हणता येत नाही.

संशोधन समस्या :-(Problem of Research)

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानव मुक्तीच्या आणि स्त्री मुक्तीच्या विचारांचा अनन्य संबंध आजवर पुरेशा प्रमाणात लक्षात घेतला गेला नाही. आंबेडकरवादातून जाती अंत आणि स्त्री मुक्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत याची अभ्यासकांनी, चळवळींनी गंभीरपणे नोंद घेतली नाही. वर्ण, जाती व्यवस्थेच्या, ब्राह्मण्यवादी संस्कृतीच्या अणि पितृसत्तेच्या जोखडातून स्त्री मुक्त होणे यातच भारतातील मानव मुक्ती सामावलेली आहे. हे अधोरेखित करणे आवश्यक असल्याच्या गंभीर जाणीवेतून प्रस्तुत संशोधन प्रकल्प पीएच.डी.पदवीकरता निश्चित केलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-(Objective of Research)

१) डॉ. बाबासाहेबांच्या विचारातून व्यक्त होणाऱ्या स्त्री स्वातंत्र्याच्या विचारास भारतीय ऐतिहासक, सांस्कृतिक वारसाचे अधिष्ठान आहे.

२) प्रामुख्याने गौतम बुध्दाच्या, फुल्यांच्या प्रागतिक, कृतिशील विचारांच्या आधारावर बाबासाहेबांच्या विचारातील स्त्री स्वातंत्र्यविषयक विचार विकसित झालेला आहे.

३) डॉ. बाबासाहेब आंबडकरांच्या विचारातून व्यक्त होणाऱ्या स्त्री स्वातंत्र्याच्या विचाराला एकूण मानवाच्या दास्य मुक्तीचे अधिष्ठान आहे.

४) बाबासाहेबांच्या विचारातून व्यक्त होणारा स्त्री स्वातंत्र्याचा विचार हा पाश्चात्य राष्ट्रात उदयाला आलेल्या स्त्री स्वातंत्र्याच्या विचारापेक्षा मुलभूत स्वरूपात वेगळा आणि क्रांतीकारक आहे.

५) बाबासाहेबांच्या विचारातून व्यक्त होणारा स्त्री स्वातंत्र्याचा विचार हा वर्ण, जातीअंत आणि वर्गान्ताशी संबंधीत आहे.

६) बाबासाहेबांच्या विचारातील स्त्री स्वातंत्र्याचा विचार आणि वर्ण जातीअंताचा विचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

७) स्त्री स्वातंत्र्याचा लढा आणि वर्ण, जाती, वर्गान्ताचा लढा परस्पर सहकार्याने विकसित झाला पाहिजे हे बाबासाहेबांच्या विचारातून सुचीत होते.

८) बाबासाहेबांच्या विचारातील स्त्री स्वातंत्र्याचा विचार एकूण मानव मुक्तीच्या विचाराशी संबंधीत असल्यामुळे आपल्या दास्यमुक्तीसाठी लढणाऱ्या पक्षसंघटना, कार्यकर्ते, चळवळींनी हा विचार समजून घेणे आवश्यक आहे.

संशोधनाची गृहीतके :-(Hypothesis)

१) डॉ. बाबासाहेबांच्या विचारातून व्यक्त होणाऱ्या स्त्री स्वातंत्र्याच्या विचारास भारतीय ऐतिहासक, सांस्कृतिक वारसाचे अधिष्ठान आहे हे सिध्द करणे.

२) प्रामुख्याने गौतम बुध्दाच्या, फुल्यांच्या प्रागतिक, कृतिशील विचारांच्या आधारावर बाबासाहेबांच्या विचारातील स्त्री स्वातंत्र्यविषयक विचार विकसित झालेला आहे हे अधोरेखित करणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबडकरांच्या विचारातून व्यक्त होणाऱ्या स्त्री स्वातंत्र्याच्या विचाराला एकूण मानवाच्या दास्य मुक्तीचे अधिष्ठान आहे हे सिध्द करणे.

४) बाबासाहेबांच्या विचारातून व्यक्त होणारा स्त्री स्वातंत्र्याचा विचार हा पाश्चात्य राष्ट्रात उदयाला आलेल्या स्त्री स्वातंत्र्याच्या विचारापेक्षा मुलभूत स्वरूपात वेगळा आणि क्रांतीकारक आहे हे स्पष्ट करणे.

५) बाबासाहेबांच्या विचारातून व्यक्त होणारा स्त्री स्वातंत्र्याचा विचार हा वर्ण, जातीअंत आणि वर्गान्ताशी संबंधीत आहे हे स्पष्ट करणे.

६) बाबासाहेबांच्या विचारातील स्त्री स्वातंत्र्याचा विचार आणि वर्ण जातीअंताचा विचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे अधोरेखित करणे.

७) स्त्री स्वातंत्र्याचा लढा आणि वर्ण, जाती, वर्गान्ताचा लढा परस्पर सहकार्याने विकसित झाला पाहिजे हे बाबासाहेबांच्या विचारातून सुचीत होते हे सिध्द करणे.

८) बाबासाहेबांच्या विचारातील स्त्री स्वातंत्र्याचा विचार एकूण मानव मुक्तीच्या विचाराशी संबंधीत असल्यामुळे आपल्या दास्यमुक्तीसाठी लढणाऱ्या पक्षसंघटना, कार्यकर्ते, चळवळींनी हा विचार समजून घेणे आवश्यक आहे हे स्पष्ट करणे.

संशोधनाचे महत्त्व :-(Importance of Research)

१) भारतातील आणि जगातील आंबेडकरवादी, परिवर्तनवादी, समाजवादी, साम्यवादी आदी मानव मुक्तीच्या, स्त्रीदास्य मुक्तीच्या चळवळींना आपल्या चळवळींचा तत्त्व आणि व्यवहार अद्यावत करून घेण्यासाठी आंबेडकरवादातील मानव मुक्तीचे, स्त्रीमुक्तीचे तत्त्वज्ञान मार्गदर्शक ठरणारे आहे.

२) भारतातील सर्व शोषित समाज घटकांनी आणि स्त्रियांनी आंबेडकरवादी मानव मुक्तीचा, स्त्रीमुक्तीचा, क्रांतीकारक व्यवहार समजून घेतल्याशिवाय त्यांच्या दास्यमुक्तीचा लढा प्रशस्त होवू शकत नाही. अशा शोषितांच्या आणि स्त्रीयांच्या

चळवळींना, पक्ष संघटना, कार्यकर्त्यांना अभ्यासकांना त्यांच्या दास्य मुक्तीचे क्रांतीकारक तत्त्वज्ञान प्रस्तूत संशोधनातून उपलब्ध होवू शकेल.

३) बाबासाहेबांचे मानवमुक्तीचे, स्त्रीदास्यमुक्तीचे तत्त्वज्ञान हे भारतातील आणि जगातील मानवाच्या दास्य मुक्तीच्या चळवळींना आणि स्त्री दास्य मुक्तीच्या चळवळींना मार्गदर्शक ठरणारे आहे. प्रस्तूत संशोधनातून त्यासाठी हे क्रांतीकारक तत्त्वज्ञान उपलब्ध होईल हे या विषयाचे विशेष महत्त्व आहे.

संशोधन पद्धती :- (Research Method)

प्रस्तूत संशोधनासाठी सामाजिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. यामध्ये ऐतिहासिक, राजकीय, विश्लेषणात्मक , वर्णनात्मक संशोधन पध्दतींचा अवलंब करण्यात येईल. त्याचबरोबर व्यष्टी अध्ययन पद्धती (Case Sudy Method) ही अवलंबण्यात येईल. प्रामुख्याने स्त्री मुक्ती, स्त्रीदास्य हा विषय भारतातील धर्म, संस्कृती, वर्ण जाती व्यवस्थेशी संबंधित असल्यामुळे आणि हा विषय मानसिक गुलामीशी संबंधित असल्यामुळे मानसशास्त्रीय पद्धतीचा ही यात अवलंब केला जाईल.

तथ्य संकलन पध्दती :- (Data Collection Method)

प्रस्तूत संशोधन पूर्ण करण्यासाठी १) प्राथमिक साधने आणि २) व्दितीयक साधने यांचा वापर करून तथ्य संकलन केले जाईल.

अ)प्राथमिक साधने :-(Primary Data)

प्राथमिक तथ्य संकलनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्व ग्रंथ, सर्व लेख, त्यांचा पत्रव्यवहार, त्यांनी दिलेली भाषणे, त्यांच्या मुलाखती आदि साधन सामुग्रीचा तथ्य संकलनासाठी प्राथमिक साधने म्हणून वापर केला जाईल.

ब) व्दितीयक साधने :- (Secondary Data)

प्रस्तुत संशोधनविषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके, नियतकालीके, साप्ताहिके, यामधून प्रस्तूत विषयाच्या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार चिंतनाच्या संदर्भात इतरांनी केलेले लेखन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वैचारिक जडण-घडण या संदर्भात त्यांच्या विषयी अभ्यासकांनी केलेले चरित्र लेखन यातून या व्दितीयक साधनातून आवश्यक ती तथ्य संकलित केली जातील.

संशोधन आराखडा :-(Research Design)

प्रकरण १ले

विषय प्रवेश :-

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना, समस्या सुत्रण, संशोधनाचे महत्त्व, उद्देश, गृहितके, व्याप्ती व अभ्यासक्षेत्र, संशोधन पध्दती, तथ्य संकलन, तथ्य विश्लेषण व प्रकरणाची रूपरेषा स्पष्ट करण्यात आली आहे.

प्रकरण २ रे

स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना : -

या प्रकरणात स्त्री स्वातंत्र्याचे स्वरूप, अर्थ, महत्त्व यांची मांडणी करण्यात आली आहे. तसेच समाजवादी, मार्क्सवादी, पर्यावरणवादी, क्रांतीकारी, दलित, अब्राह्मणी स्त्रीवाद यांचे स्वरूप तसेच स्त्रीवादास कारणीभूत घटक जसे- लिंग, सेक्स, पितृसत्ताक, मातृसत्ताक, भांडवलशाही यांचा आढावा घेण्यात आला आहे आणि जागतिक स्तरावर म्हणजेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्री स्वातंत्र्यासाठी ज्या संघटना, चळवळी कार्यरत आहेत. त्यांचाही सारांश घेण्यात आला आहे.

प्रकरण ३ रे

डॉ. बाबासाहेबांची स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना : -

प्रस्तुत प्रकरणात विविध कालखंडामध्ये जसे प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक किंवा वसाहतीचा कालखंड यामध्ये स्त्री स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे स्वरूप कसे होते. व तिचा विकास कसा झाला तसेच त्या कालखंडातील स्त्रियांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थिती कशा स्वरूपाची होती आणि त्या कालखंडात स्त्री स्वातंत्र्यासाठी काय उपाय योजना सुचविण्यात आल्या आहेत याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

प्रकरण ४ थे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत स्त्री स्वातंत्र्याची केलेली मांडणी : -

प्रस्तुत प्रकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही शासन पध्दतीचा स्वीकार करणाऱ्या भारताने स्वातंत्र्य, समता, भातृभाव व न्याय या तत्त्वांना प्राधान्य दिले याचप्रमाणे विकासाच्या प्रवाहात महिलांना आणण्याचा प्रयत्न ही केला. महिलांना सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासाची समान संधी मिळावी यासाठी भारतीय संविधानात महिलांसाठीच्या संविधानिक तरतूदी, कलम-१४,१५,१६,१९,२३,३९ (ब), ४२,५२(अ), २४३ (ब) या व अशा अनेक तरतूदी केल्या आहेत. तसेच हिंदू कोड बिलाची विशेष तरतूद करण्यात आली आहे.याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

प्रकरण ५ वे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना आणि सद्यस्थिती : -

प्रस्तुत प्रकरणात भारतीय राज्यघटनेमध्ये महिलांना मोठ्या प्रमाणात अधिकार बहाल करण्यात आले असले व त्यांना संरक्षणाची हमी देण्यात आली असली तरी त्यांना खरोखर स्वातंत्र्य प्राप्त झाले का? त्यांना खरोखर/ वास्तवात समानतेची वागणूक मिळते का?त्यांना समाजात, राज्यात खरोखर न्याय मिळतो का?हे अभ्यासने काळाची गरज आहे.यासाठी डॉ. आंबेडकराची जे विचारचिंतन मांडले आहे ते आजच्या स्थितीला कसे उपयुक्त आहे याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

प्रकरण ६ वे

निष्कर्ष : -

शोधप्रबंधातील शेवटचे प्रकरण निष्कर्ष व शिफारशीचे आहे.प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाचा सारांश, निष्कर्षाची, गृहितकांची, पडताळणी आणि शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

संशोधक विद्यार्थिनी
कु. मनिषा काशिनाथराव पाटील
पीपल्स कॉलेज नांदेड

संशोधक मार्गदर्शक
डॉ. शरद कुलकर्णी
प्राचार्य, विभाग प्रमुख,राज्यशास्त्र विभाग,
नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी

संदर्भसुची

१) मूल जाधव सुशिला, भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २७ मे २००६, पृ.१०१

२) नरके हरी (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड-१९, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती,२००५, पृ.२०२

३) मूल जाधव सुशिला, भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २७ मे २००६, पृ.१०१

४) उपरोक्त, पृ.८७

५) मनू वसंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, नववी आवृत्ती २०१३,पृ.३१

६) नरके हरी (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड-१९, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती,२००५, पृ.२०२

७) उपरोक्त, पृ.२०२

८) लोकराज्य, एप्रिल २०१६, पृ.१९

९) उपरोक्त, पृ.३०

१०) लोकराज्य, एप्रिल २०१६, पृ.३०

११) मनू वसंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृ. ३४

१२) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी सुधारित आवृत्ती, ६ डिसे. २००६, पृ.१२५-१२६

१३) उपरोक्त, पृ.१२६

१४) लोकराज्य, एप्रिल २०१५, पृ.१५

१५) मूल जाधव सुशिला, भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २७ मे २००६, पृ.८४

१६) उपरोक्त, पृ.८४